# केसरी—शुक्रवार, दिनांक २८ नोव्हेंबर १९५२

# आहिताग्नि राजवाडे यांचें निधन

पुणें, दि. २७:—आहिताग्नि शंकर रामचंद्र राजवाडे आज चार वाजतां आपल्या निवासस्थानीं निधन पावले. गेले दोन महिने ते आजारी होते.

१८७९ सालीं राजवाड्यांचा जन्म झाला. १८९६मध्ये ते मॅट्रिक झाले. त्यांच्या वडिलांना लष्करी हिशेबखात्यांत नोकरी होती. त्यांच्या निधनानंतर शंकररावांनीहि त्याच खात्यांत चार पांच वर्षे नोकरी केली.

डेक्कन कॉलेजांतील बारा वर्षांच्या वास्तव्यांत राजवाड्यांनी तत्त्वज्ञान या ऐच्छिक विषयापेक्षा इतिहास अर्थशास्त्रादि अवांतर विषयांचें भरपूर वाचन केलें. नवीनांतील नवी विचारसरणी व जुन्यांतील जुनी नीति यांचा राजवाड्यांच्या ठिकाणीं विस्मयकारक मिलाफ झालेला होता. १९१२ सालीं ते बी. ए. झाले. मुंबईस एलएल. बी.च्या टर्म्स भरीत असतां त्यांनी 'गीताभाष्य' लिहावयास घेतलें. तेथूनच त्यांचें 'धर्मकारण' सुरू झालें. १९१८ मध्ये त्यांनी 'मीमांसा महाविद्यालय' स्थापन केलें व १९२० मध्ये अग्निहोत्राची दीक्षा घेतली. भारतांत सर्वत्र प्रवास करून आणि बृहन्महाराष्ट्रांत हजारो व्याख्यानें देऊन त्यांनी धर्मकार्यांना कणखणीतपणें प्रचार केला. त्यांनी स्वतःच्या पुढाकारानें आपल्या निवासस्थानीं गेल्या कांहीं वर्षांत निरनिराळ्या सामाजिक प्रश्नांबाबतच्या आठदहा परिषदा भरविल्या. तेथेंच प्रतिवर्षी 'शारदीय ज्ञानसत्र' ते चालवीत असत. ते कट्टर 'मीमांसक' होते. सनातन वैदिक धर्म हा विजिगीषु आर्यांचा यज्ञधर्म आहे व वेदांतलें तत्त्वज्ञान प्रवृत्तिपर आहे असें त्यांचें ठाम मत होतें. शांकर मताच्या मंडळींशीं त्यांचे अनेकदा वाद झाले व एकदां तर खुद्द जगद्गुरूंनी त्यांच्या विरुद्ध बहिष्कार फर्माविला!

साडेतीन हजार पृष्ठांचें 'नासदीय सूक्तभाष्य' हें राजवाड्यांच्या नव्या जुन्या विद्येच्या व्यासंगाचें फळ होय. 'ख्रिस्तांतक नीट्शे व नीट्शेचा ख्रिस्तांतक', 'ईशावास्योपनिषद् भाष्य' व 'षड्दर्शन समन्वय आणि पुरुषार्थ मीमांसा' हे त्यांचे इतर महनीय ग्रंथ होत. 'मी व माझें कार्य' हा त्यांचा आत्मचरित्रात्मक ग्रंथ निम्याहून अधिक लिहून झाला आहे. गेलीं तीन चार वर्षे राजवाडे हातापायांस जडलेल्या मुंदवायिरतेच्या विकारानें आजारी होते. अलीकडे किडनीच्या आजाराचाहि त्रास होत असे. तीन मिळवते मुलगे, चार मुली व पत्नी एवढा यांचा परिवार आहे.

केसरी २८ नोव्हेंबर १९५२



## राजवाडे-व्यक्तिविशेष

★ लोकमान्य टिळकांचे राजवाडे हे प्रथमपासून निस्सीम भक्त होते. वीर-पुजारी म्हणून ते लोकमान्यांसंबंधी अत्यंत आदरानें बोलत असत. लोकमान्यांचीं राजकीय मतें त्यांना सर्वथैव मान्य होती. परंतु, टिळकांच्या तत्त्वज्ञानविषयक लिखाणाबद्दल राजवाडे आक्षेप घेत. टिळकांनी वेदान्ताशीं 'प्रतियोगी सहकारिता' केली होती असें त्यांना वाटे!

★ चाफेकर बंधूंच्या वेळच्या दहशतवादी देशभक्तांशीं राजवाड्यांचा निकटचा संबंध आला असावा. त्यांना बी. ए. ची पदवी घेतांना 'कॉन्व्होकेशन हॉलमध्ये येण्यास सरकारची परवानगी नव्हती. त्यांना सक्तीनें 'इन ॲब्सेन्शिया डिग्री' घ्यावी लागली!

★ डेक्कन कॉलेजांतील प्रख्यात प्रो. वेन यांचे राजवाडे शिष्य होते. कॉलेजमध्यें असतांना प्रि. वेन यांच्या वर्गातील व्याख्यानांचीं स्वतः घेतलेलीं टिपणें त्यांनीं शेवटपर्यंत जपून ठेवलीं. वेनविषयक लिखाण लिहिणारा दिल्ली विद्यापीठाचा पदवीधर विद्यार्थी राजवाडे यांच्या भेटीसाठीं आला होता. प्रि. वेन यांच्या प्रवचनांनींच प्रवृत्त होऊन, हिंदुस्थानांत 'कार्ल मार्क्स'चे इंग्रजी ग्रंथ येण्यापूर्वीच राजवाडे यांनी जर्मनमधून मार्क्सचा 'कॅपिटल' ग्रंथ वाचला.

★ गायन-वादनाचा राजवाडे यांना विलक्षण शोक असे. ते आपल्या दिवाणखान्यांत गायक-गायिकांचे जलसे करीत व अन्यत्रहि उपस्थित राहत. शंकर गुरवाजवळून त्यांनी तबला शिकून घेतला होता.

★ स्वतःच्या परिश्रमानें राजवाडे यांनी आपल्या राहत्या घरांत-अग्निहोत्रमंदिरांत-वेगळेंच जग निर्माण करून ठेवलें आहे. अनेकविध भाषांतील दुर्मिळ पुस्तकें, मुद्दाम तयार करविलेलीं लहानमोठीं चित्रें व अभ्यासपूर्वक टिपणें असलेल्या वह्या यांचा तेथें खच पडलेला आहे.

★ त्यांच्या बोलण्यांतील आत्मगौरवाचा भाग नवीन श्रोत्यांच्या चटकन ध्यानांत येई!